सकाळ

सकाळ | सातारा

सातारा, शुक्रवार, ८ एप्रिल २०२२

TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



**तडवळे संमत कोरेगाव : ग्रामपंचायतीच्या वतीने महाविद्यालयास सन्मानचिन्ह देताना मोनाली झांजुर्णे व मान्यवर.**

# तडवळेसाठी 'डीपी'च्या विद्यार्थ्यांचे योगदान : झांजुर्णे

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**कोरेगाव, ता. ७ :** ग्रामस्वच्छतेतून ग्रामसमृद्धी साधण्याचा संत गाडगेबाबा यांचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणून कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तडवळे गावासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, असे मत सरपंच मोनाली झांजुर्णे यांनी व्यक्त केले.

तडवळे संमत कोरेगाव (ता. कोरेगाव) येथे डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत आयोजित केलेल्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी उद्योजक सदाशिव बोराटे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक मानसिंगराव चव्हाण उपस्थित होते. दरम्यान, शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच श्रीमंत झांजुर्णे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झाले. शिबिर कालावधीत श्रीधर साळुंखे, वनक्षेत्रपाल राहुल काळे, प्रा. निरंजन फरांदे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उदय चव्हाण, मानसिंग जगदाळे यांची प्रबोधनपर व्याख्याने झाली. शिबिरार्थीनी ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामसर्वेक्षण, ग्राम दैवत पीर साहेब दर्गा परिसर, स्मशानभूमी, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, सिद्धेश्वर हायस्कूल आदी ठिकाणी श्रमदान करून स्वच्छता उपक्रम राबवले. शिबिरास शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. डी. पाटील, प्रा. एन. एम. गोसावी, प्रा. पी. एस. पवार, प्रा. एस. एच. सकुंडे, उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, डॉ. विजय वाडते, तडवळे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.